आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० ऑक्टोबर २०२६ - शनिवार

## ठळक बातम्या

- शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई मिळण्यासाठी पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करण्याच्या केंद्रीय पथकाच्या सूचना

- मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या हजारो आंदोलकांची विविध ठिकाणी धरपकड

- वैमानिक स्मित मच्छार यांच्यावरच्या हल्ल्याप्रकरणी NIA कडून गुन्हा दाखल

- बदललेल्या परिस्थितीनुसार भारत आणि अमेरिका व्यापार कराराचा अंतिम मसुदा तयार होणार

**आणि**

- रशियाने युक्रेनवर आज केलेल्या हल्ल्यात १५ जण ठार

<><><><><>

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिवाळीपूर्वी मिळावी, यासाठी पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना केंद्रीय पथकाचे प्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांनी दिल्या.

दुष्काळी परिस्थितीचं वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी शेतपीक नुकसान, पर्जन्यमान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, भूजल पातळी, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या संधी या बाबींचा एकत्रित विचार करावा. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून आकडेवारीची प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करावी आणि शेतकऱ्यांना भरपाई वेळेत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असं अग्रवाल यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

राज्यातल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयानं, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीनं काम करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडवण्यासाठी जलसंधारणाची कामं प्रभावीपणे राबवावीत, अशा सूचनाही त्यांनी केल्या.
यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत ते बोलत होते.

<><><><>

संरक्षण, एअरोस्पेस आणि ऊर्जा या क्षेत्रांना महत्त्वाच्या खनिजांचा सुरळीत पुरवठा होत राहण्याच्या दृष्टीनं या खनिजांचा साठा करण्यासंदर्भातलं धोरण सरकार जाहीर करणार असल्याची माहिती खाण सचिव केशव चंद्रा यांनी दिली आहे. बॅटरीसाठी लागणाऱ्या खनिजांचं मूल्यवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश आणि ओदिशा इथं ४ प्रक्रिया केंद्रांचंही कामही सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं. तांबं, लिथियम, निकेल, कोबाल्ट आणि इतर दुर्मिळ खनिजं ही स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाच्या क्षेत्राच्या वाढीसाठी अतिशय गरजेची असतात.

<><><><>

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी दोघांना अटक केली. एका कथित आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्कर टोळीशी त्यांचा संबंध आहे. आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर सलीम इस्माली डोला आणि त्याचे साथीदार ही टोळी चालवतात. प्रवीण ऊर्फ नागेश शिंदे आणि ब्रिजेश मोराडिया अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावं आहेत.

<><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीनं नवी दिल्लीत जंतरमंतर इथं पुकारलेल्या आंदोलनाच्या

पार्श्वभूमीवर दिल्लीत आंदोलकांची धरपकड सुरूच आहे. विविध ठिकाणांवरून सुमारे ७ हजार आंदोलकांना ताब्यात घेण्यात आलं आहे, तर या कारवाईत ६ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाइस कास्ट

*(कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी नवी दिल्लीत विमानातूनच ताब्यात घेतलं. माणिक सरकार, पिनराई विजयन, ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल या ४ माजी मुख्यमंत्र्यांसह इतर अनेक नेतेरही पोलिसांच्या ताब्यात आहेत. ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण, सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव, विद्यार्थी नेत्या नेहा बोरा, युट्युबर ध्रुव राठी यांच्यासह इतरांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे. सुरक्षेच्या कारणास्तव आणि प्रशासनिक कारणांसाठी पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारली होती.*

*स्टूडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेच्या ४०० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांनाही तसंच काही आंदोलक वकिलांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या हस्तक्षेपानंतर वकिलांना सोडून देण्यात आलं.*

*जंतरमंतरच्या बाहेर प्रचंड मोठा पोलीस बंदोबस्त आहे. संपूर्ण दिल्लीत पोलीस आणि निमलष्करी दलांचे जवळपास २५ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. दिल्लीतली ४५ मेट्रो स्थानकं आज रात्री १०पर्यंत बंद राहणार आहेत. दिल्लीच्या सीमा, रेल्वेस्थानकं, बस स्थानकांसह इतर संवेदनशील ठिकाणांवर सुरक्षा गस्त वाढवण्यात आली आहे. जंतरमंतरच्या ४ किलोमीटर परिसरात इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद आहेत. तसंच दिल्लीला जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत.*

*दिल्लीतल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानातही आज आंदोलन झालं. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी, सामाजिक कार्यकर्ते फिरोज मिठिबोरवाला यांच्यासह इतरांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं. ऑगस्ट क्रांती मैदान ही आंदोलनांची जागा नाही आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचं पोलिसांनी सांगितलं. तसंच याठिकाणी आंदोलन करणाऱ्या साधारण २०० जणांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे. वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी हुतात्मा चौकात ठिय्या आंदोलन केलं, यावेळी पोलिसांनी ५०पेक्षा जास्त जणांना ताब्यात घेतलं.)*

<><><><><>

परकीय शक्तींच्या पाठिंब्याने घटनात्मक संस्था कमकुवत करण्याचा आणि नागरिकांचा लोकशाहीवरचा विश्वास तोडण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी दिल्लीत विरोधी पक्ष आणि इतर संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनासंदर्भात ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतल्या मेट्रो आणि रेल्वेची वाहतूक पूर्णपणे बंद करू नये असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप करणारी याचिका आज दाखल करण्यात आली.

<><><><><>

फ्लायदुबई कंपनीच्या विमानात वैमानिक स्मित मच्छार यांच्यावर सहवैमानिकाने केलेल्या हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं गुन्हा दाखल केला आहे. गेल्या ३० सप्टेंबरला झालेल्या या प्रकाराबाबत अपहरण विषयक कायदा आणि बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा यूएपीए अंतर्गत काल ९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. स्मित मच्छार यांच्यावरचा हल्ला हा व्यापक कटाचा भाग असल्याचा सरकारी यंत्रणांना संशय आहे.

<><><><>

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या अंतरिम व्यापार कराराचा मसुदा या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात तयार झाला होता, पण आता परिस्थिती बदलली आहे, त्याला अनुसरून या कराराला अंतिम स्वरूप दिलं जाईल, अशी भूमिका वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी मांडली आहे. अमेरिकन बाजारपेठेतल्या इतर स्पर्धकांच्या तुलनेत भारतावरचे कर कमी करायचाही भारताचा प्रयत्न आहे, असंही ते म्हणाले. इस्रायल, आखाती सहकार्य परिषद आणि रशियाच्या नेतृत्वातल्या युरेशियन आर्थिक संघटनेसह इतरही संस्थांशी व्यापार कराराबाबत चर्चा सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याची मागणी पुन्हा केली आहे. जागतिक निर्णय प्रक्रियेत भारत आणि आफ्रिकेचं प्रतिनिधित्व कमी पडू शकत नाही, असंही ते म्हणाले. इथियोपियातल्या अदिस अबाबा इथल्या कार्यक्रमात ते बोलत होते. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत आफ्रिकेला कायमस्वरूपी आणि अस्थायी अशा दोन्ही प्रकारच्या सदस्यत्वामध्ये न्याय्य प्रतिनिधित्व मिळायला हवं, अशी मागणी जयशंकर यांनी केली.

<><><><>

रशियाने युक्रेनवर आज केलेल्या हल्ल्यात किमान १५ जण ठार झाले आणि १६ जण जखमी झाले. मृतांमध्ये तीन मुलांचा समावेश आहे. युक्रेनच्या झापोरिझ-झिया प्रांतातल्या निवासी इमारतींवर हा हल्ला झाल्याची माहिती लष्करी प्रशासनाचे प्रादेशिक प्रमुख मिखाइलो सेमिकिन यांनी दिली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून डिझेल खरेदीसाठी कराराची काल घोषणा केली आणि आज दुसऱ्याच दिवशी हा हल्ला झाला. या करारामुळे युक्रेनमधल्या युद्धासाठी मॉस्कोला आर्थिक रसद पुरवली जाईल, असा इशारा युक्रेननं दिला होता.

<><><><><>

सुदानमध्ये झालेल्या ड्रोन हल्ल्यात काही मुलांसह किमान ४० जण ठार झाले आहेत. २०२३ पासून सुदानच्या लष्कराशी संघर्ष करत असलेल्या 'रॅपिड सपोर्ट फोर्सेस' या गटाने हा हल्ला केल्याचं म्हटले जात आहे.

<><><><><>

भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं कार्यकारी परिषदेच्या निवडणुकीची आज नवी दिल्लीत घोषणा केली. सध्या कार्यरत समितीचा कार्यकाळ संपायच्या ५ दिवस आधी म्हणजेच ५ डिसेंबरला ही निवडणूक होणार आहे. निवडणूक अधिकारी म्हणून संजय कुमार श्रीवास्तव यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. श्रीवास्तव हे दिल्ली आणि चंदीगडचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त आहेत.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना इंदोर इथं उद्या संध्याकाळी सात वाजता होणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतल्या आतापर्यंत झालेल्या दोन सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिजनं प्रत्येकी एक विजय मिळवत बरोबरी साधली आहे.

//<><><><><>//